नोव्हेंबर २०१०| ₹३०

# अर्थपूर्ण

व्यक्ती, समाज आणि देशाच्या परिपूर्ण विकासासाठी...

स्वाभिमानी, आनंदी, परिपूर्ण जीवनाचा करु स्वीकार; बेरोजगारी, गुन्हेगारी, भ्रष्टाचार, दहशतवादाला देऊ नकार



# आहे, उत्तर आहे...

**यमाजी मालकर**
ymalkar@gmail.com

### व्यवस्थेची गुलामगिरी त्रासदायक वाटते काय ?

आज आपल्या जगण्याविषयी प्रत्येक जण तक्रार करतो आहे की, सर्व काही आहे तरीही काही तरी बिघडले आहे. तो बिघाड नेमका काय आहे, हे मात्र सांगता येत नाही. डोक्याला ताण दिला की लक्षात येते, की सध्याच्या व्यवस्थेची गुलामगिरी आपल्याला त्रासदायक ठरते आहे. म्हणजे असे की आपली भरपूर कष्ट करण्याची तयारी आहे, आपल्याला प्रामाणिक आयुष्य जगायचे आहे, आपल्या आजूबाजूची माणसंही आनंदी असावी आणि मानवी प्रतिष्ठेचे, एक परिपूर्ण, अर्थपूर्ण जीवन आपल्याला जगता यावे, असे आपल्याला मनापासून वाटते. त्या दिशेने आपण चालण्याचा प्रयत्नही करतो. मात्र व्यवहारात परिपूर्ण जीवन जगण्याची इच्छा जणू स्वप्नच ठरते! वैयक्तिक आणि सार्वजनिक आयुष्यात सतत तडजोडीच कराव्या लागतात. खरे म्हणजे असे परिपूर्ण, अर्थपूर्ण जीवन जगायला मिळावे, असे वाटण्यात कोणी अतिरेकी अपेक्षा करतो आहे, असे मानण्याचे अजिबात कारण नाही. तरीही ते परिपूर्ण, समाधानी जीवन आपल्यापासून सारखे लांबलांब का पळते आहे? अनुनय आणि गुलामगिरीला आपण अजूनही का नाकारू शकत नाही? मिंधेपणाचे धडे देणारी व्यवस्था आपण का कवटाळून बसलो आहोत? सर्वांचे भले चिंतणारी आणि त्यानुसार प्रत्यक्षात काही सकारात्मक घडते आहे, अशी व्यवस्था निर्माणच होऊ शकणार नाही काय?

### अव्यवस्थेचे खापर कोणावर मोडायचे?

थोडा मुळातून विचार केला की लक्षात येते, की विसंगतींनी भरलेल्या व्यवस्थेत स्पर्धेत पुढे राहण्यासाठी आणि आरामदायी प्रवासासाठी आपल्यापैकी काहीजणांनी 'फार भारीची गाडी' घेतली आहे. आपलीच गाडी सुसाट पळावी, रस्त्यात कोणताच अडथळा येऊ नये, असे त्यांना वाटते. मात्र ती पळविण्यासाठी आणि चालविण्याचा आनंद घेण्यासाठी 'चांगला रस्ता' सापडत नाहीए. कारण रस्ता तर एकच आहे आणि त्याच रस्त्याने 'साध्या गाड्या', रिक्षा, दुचाकी, सायकली, पायी चालणारी माणसे, हातगाड्या आणि बैलगाड्याही चालल्या आहेत. म्हणून सर्वांनाच एकमेकांचा त्रास होतो आहे. आपल्याला पाहिजे असलेला 'रस्ता' शोधण्याचा प्रत्येकाचा दररोज प्रयत्न चालला आहे पण तो सापडत नाहीए. मग हा शोध अर्धवट सोडून आपण नव्या दिवसाला सामोरे जातो. आपण ज्या समूहात राहतो तो सोडून इतर समूहांवर या अव्यवस्थेचे खापर मोडून मोकळे होतो. एकेकट्यांच्या गाडीसाठी 'चांगला रस्ता' बनूच शकणार नाही. 'सर्वांच्या गाड्यांसाठी' मात्र उत्तम रस्ता होऊ शकतो हेही हळूहळू आपल्याला कळायला लागते. आपले अस्तित्व, आपले सुखसमाधान परस्परावलंबी आहे, हे मान्य करावेच लागते. मग लक्षात येते, की 'रस्ता' सर्वांसाठी व्हावा, यासाठी सर्वांनीच प्रयत्न करावे लागणार आहेत. म्हणजे आपल्यातला प्रत्येकजण प्रामाणिक, समृद्ध आणि शांत जीवनाच्या शोधात आहे. या प्रकारचे जीवन देऊ शकणाऱ्या सामाजिक, आर्थिक, राजकीय व्यवस्थेचे स्वप्न आपण पाहत आहोत. हे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत, असेही आपल्याला प्रामाणिकपणे वाटते, मात्र मार्ग सापडत नाही, ज्यांनी असा मार्ग शोधण्याचा ध्यास कधीही सोडलेला नाही, त्या प्रत्येकासाठी 'अर्थक्रांती' आणि त्या संकल्पनेला वाहिलेले हे 'अर्थपूर्ण' मासिक आहे. 'जगात जो बदल घडावा असे तुम्हाला वाटते, तो बदल आधी तुमच्यात झाला पाहिजे, त्यामुळे त्या बदलासाठीचे प्रयत्न स्वतःपासून सुरू करा,' असे महात्मा गांधींनी म्हटले आहे. ते आपल्याला मान्य केलेच पाहिजे. आता आपल्याला त्याच्या पुढे जाऊन या बदलासाठी १२० कोटी भारतीयांना तयार करायचे आहे. याचा अर्थ १२० कोटींच्या अर्थपूर्ण जगण्याच्या चळवळीत आपल्याला सहभागी व्हायचे आहे.

### ... म्हणून स्वप्नच पाहायची नाहीत ?

आपण म्हणाल, हे होणार कसे? राजकीय नेते, काळा पैसा बाळगणारी मंडळी, भ्रष्ट अधिकारी हे कसे होऊ देतील? हे तर स्वप्नवत वाटते. स्वप्नवत आहे म्हणून अशी स्वप्ने पाहायचीच नाहीत, असा कोणी नियम केलाय? आणि केलाही असेल तर आपण तो का म्हणून पाळायचा? ज्या मानवी समूहांनी उघड्या डोळ्यांनी नव्या वाटांवरून वाटचाल केली, ते समूह प्रगत माणसांचे समूह बनले आणि इतर समूहांना त्यांच्या अनुकरणात धन्यता मानावी लागली. मग अशी एखादी नवी वाट आपणच का आखू नये? आपल्याला मनापासून भावलेल्या, पटलेल्या

**‘जगात जो बदल घडावा असे तुम्हाला वाटते, तो बदल आधी तुमच्यात झाला पाहिजे, त्यामुळे त्या बदलासाठीचे प्रयत्न स्वत:पासून सुरू करा,’ असे महात्मा गांधींनी म्हटले आहे. ते आपल्याला मान्य केलेच पाहिजे. आता आपल्याला त्याच्या पुढे जाऊन या बदलासाठी १२० कोटी भारतीयांना तयार करायचे आहे. याचा अर्थ १२० कोटींच्या अर्थपूर्ण जगण्याच्या चळवळीत आपल्याला सहभागी व्हायचे आहे.**

बदलासाठी आपण लढतो आहोत, अशा धाडसामध्ये आणि नव्या वाटा शोधण्यातच तर जीवनाचे सार सामावले आहे. प्रश्न आपले आहेत तर उत्तरेही आपलीच असली पाहिजेत. अर्थक्रांतीच्या या चळवळीत सहभागी व्हायचे म्हणजे ही उत्तरे शोधण्याचा पुरुषार्थ करायचा!

## दुसरा पर्याय तरी कोठे आहे?

आणि हेही लक्षात घेऊयात, की अर्थपूर्ण जगण्याच्या चळवळीत सहभागी होण्याशिवाय आता आपल्यासमोर पर्याय तरी कोठे आहे? सार्वजनिक जीवनमान सुधारणार नाही तोपर्यंत आपल्याला विकासाची फळं चाखता येणार नाहीत, हे आता स्पष्ट झाले आहे. भारतासारख्या खंडप्राय देशाने स्वातंत्र्यानंतरच्या ६३ वर्षांत सर्वच क्षेत्रांत फार मोठा टप्पा गाठला आहे. जगातील सर्वांत मोठी लोकशाही म्हणून आम्हाला लोकशाहीचा अभिमान आहे, मात्र या लोकशाहीत अनेक त्रुटी आहेत, हेही आपण सर्व जाणून आहोत. भारतीय लोकशाहीला चांगल्या प्रशासनाची आणि चांगल्या आर्थिक व्यवस्थापनाची गरज आहे, याविषयी कोणाचेच दुमत नाही. मात्र ते कसे करायचे, या प्रश्नाला सहजासहजी उत्तर मिळत नाही. मात्र आज अनेकांना माहीत असलेले एक उत्तर आहे - अर्थक्रांती! अर्थक्रांती प्रतिष्ठानचे अध्यक्ष अनिल बोकील यांनी १२ वर्षांपूर्वी अर्थक्रांती संकल्पना देशासमोर ठेवली. प्रतिष्ठानने त्याचे कॉपीराईट घेतले. गेल्या एका तपात या संकल्पनेवर देशभर चर्चा सुरू आहे. राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, लालकृष्ण अडवानी, श्री श्री रविशंकर, रामदेव बाबा यांच्यापासून हजारो नेते, अधिकारी, कार्यकर्ते, व्यावसायिक, नोकरदार, तरुण आणि सर्वसामान्य नागरिक... अशा हजारो भारतीयांनी अर्थक्रांतीच्या पाच कलमी प्रस्तावात सुखी-समाधानी भारताचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्याची ताकद असल्याचे म्हटले आहे. (ज्यांनी हे प्रस्ताव अद्याप जाणून घेतलेले नाहीत, त्यांच्यासाठी या अंकात ते स्वतंत्रपणे दिले आहेत. ते प्रत्यक्षात कसे येऊ शकतात, याची व्यूह रचनाही तयार करण्यात आली आहे. www.arthakranti.org या वेबसाईटवर आपण ती पाहू शकता. ते वाचून आपल्याला काय वाटते, ते ‘अर्थपूर्ण’ला जरूर कळवा) ज्यांना अर्थक्रांतीच्या प्रस्तावांचे महत्त्व कळले, ते या चळवळीत सहभागी होतात, असा गेल्या तपभराचा अनुभव आहे. एवढ्या मोठ्या कुटुंबात आपण सहभागी झालात की हे स्वप्न केवळ स्वप्न राहणार नाही. प्रामाणिकपणे आणि मानवी प्रतिष्ठेने जगण्याचा तो राजरस्ता ठरेल, असा आम्हाला विश्वास आहे.

## मग हे बदल करायचे कोणी?

हे मान्य आहे की लोकरेट्याशिवाय देशात एवढा मोठा बदल, एवढे मूलभूत बदल होणार नाहीत. वरून लादलेले बदल नागरिक खऱ्या अर्थाने स्वीकारत नाहीत, हा आजवरचा अनुभव आहे. पण मग हे बदल करायचे कोणी? तर आपणच. आपण सर्वांनी. म्हणजे १२० कोटी लोकांनी १२० कोटींसाठी. असा लोकरेटा निर्माण करण्याचा एक प्रामाणिक आणि दमदार प्रयत्न म्हणून ‘अर्थपूर्ण’ मासिक काम करणार आहे. आपण सर्वजण त्याचे भागधारक आहात, कारण त्याचे लाभार्थी आपण आणि आपण ज्यांच्यावर अतिशय प्रेम करतो, ती आपल्या सर्वांची मुले, आपली पुढील पिढी आहे. आपल्या मुलांच्या ‘गाड्या’ तर आपल्यापेक्षा अधिकच भरधाव वेगाने पळणार आहेत. म्हणूनच त्यांना सुव्यवस्थेचा हा ‘रस्ता’ आखून द्यावा लागणार आहे. १२० कोटींसाठी निरपेक्षपणे ही आखणी करण्याचे काम आपल्याला ‘अर्थपूर्ण’च्या माध्यमातून करावयाचे आहे. मासिक आधी मराठीतच का, याचे उत्तर आहे, मराठी माणसाने हे प्रस्ताव मांडले म्हणून सुरवात मराठीतून, मात्र ही चळवळ देशभर नेण्यासाठी भविष्यात हिंदीत, इतर स्थानिक भाषांत आणि इंग्रजीत ‘अर्थपूर्ण’ पोहचणारच आहे.

## दारिद्र्याचे वाटपच का, निर्मूलन का नाही?

‘अर्थक्रांती’ प्रतिष्ठान जसे स्वतंत्र आहे, तसेच ‘अर्थपूर्ण’ही स्वतंत्र आहे. कोणतीही व्यक्ती, राजकीय पक्ष, उद्योगसमूह, जात-धर्म-पंथ, प्रदेश, भाषा अशा विशिष्ट समूहाशी ‘अर्थपूर्ण’ बांधील नाही. माणसांतले असे कृत्रिम भेद ‘अर्थपूर्ण’ला मान्य नाहीत. सर्व १२० कोटी भारतीयांशी मात्र त्याची अतूट बांधिलकी आहे. मुळात भारतीयांचे जेथे हित आहे, तेथे या प्रकारचे भेद उपस्थित होता कामा नयेत, अशीच ‘अर्थपूर्ण’ची भूमिका आहे. आपल्यातील कृत्रिम भेदांनी आपले आतापर्यंत फार नुकसान केले आहे. आता पाच बोटांची मूठ घट्ट करूनच आपल्यासमोरील प्रश्न सोडविणे क्रमप्राप्त आहे. आपल्यातील भेदाभेद का वाढते आहेत, हेही आपण जाणून आहोत. आपण सातत्याने दारिद्र्याचे वाटप




करण्याचा प्रयत्न करतो. सर्वांना एकत्र येऊन आता आपल्याला त्याचे समूळ निर्मूलन करायचे आहे. आपल्याला माहीत आहे की आपले संघर्ष हे पुरेशी संधी आणि पुरेशा पांढऱ्या पैशाअभावी पेटलेले आहेत. करांची वसुली करून सरकार दर वर्षी तिजोरी भरण्याचा प्रयत्न करते, मात्र त्याला यश प्राप्त होत नाही. त्यामुळे सरकार पायाभूत सुविधांवर पुरेसा खर्च करू शकत नाही. पायाभूत सुविधांअभावी सर्वव्यापी विकासाला गती मिळत नाही, म्हणून रोजगाराच्या संधी वाढत नाहीत. त्या वाढत नाहीत म्हणून खऱ्या अर्थाने क्रयशक्ती वाढत नाही, आणि क्रयशक्ती वाढत नाही म्हणून टिकाऊ विकासाला गती मिळत नाही. शिवाय देशातील काळा पैसा वाढतच चालला आहे. काळ्या पैशामुळे समाजातील आर्थिक दरी रुंदावत चालली आहे. आमच्याकडे नैसर्गिक साधनसंपत्ती आहे, आमच्याकडे मनुष्यबळ आहे, आमच्याकडे आमची समृद्ध संस्कृती आहे. मात्र या सर्वांचा सुंदर मिलाफ करू शकणारी व्यवस्था आमच्याकडे नाही. ती व्यवस्था लवकरात लवकर प्रस्थापित करण्यासाठी 'अर्थक्रांती प्रतिष्ठान' आणि 'अर्थपूर्ण' प्रयत्नशील आहे.

### जहाजात असलेले सर्वच बुडणार ना?

शब्दात जे मांडता येत नाही, ते अनेकदा चित्रांमधून चपखलपणे मांडता येते. अर्थक्रांतीची ही दोन चित्र मला फार आवडतात. तुम्हालाही ती आवडतील, याची मला खात्री आहे. आज आपल्यातले काही जण भौतिक समृद्धी अनुभवत आहेत. मात्र ते ज्या जहाजात बसले आहेत, ते तर बुडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या जहाजाला बुडविण्यापासून आपल्याला वाचवायचे आहे. अर्थक्रांतीची भूमिका आहे, की आपण देशबांधव आहोत, त्यामुळे आपण सर्वांना वाचवू यात. आमचे प्रश्न आज सुटल्यासारखे वाटतात म्हणून आम्ही पळपुटेपणा करणार नाही. आमच्या व्यवस्थेत कोठे बिघाड झाला, ते अर्थक्रांतीच्या आधारे आम्ही शोधून काढू आणि पुढील सुखासमाधानाचा प्रवास सुरू करू. याच्याशिवाय वेगळा काही मार्ग असेल तर त्या मार्गाने जाण्याची आमची तयारी आहे. मात्र आता बिघाड दूर केल्याशिवाय प्रवास करणे धोक्याचे आहे! आत्मघातकी आहे! दुसऱ्या चित्राविषयी इतकेही शब्द खर्च करण्याची गरज नाही. त्याचा अनुभव आपण दररोज घेत आहोत. आपल्यावर वेळ येत नाही, तोपर्यंत आपल्याला वाटते की तो आपला प्रश्न नाही. पण मग जेव्हा आपणच 'हॉस्पिटल'मध्ये दाखल होतो, तेव्हा उशीर झालेला असतो. आपण आपली निर्णयक्षमता हरवून बसलेलो असतो. त्यासाठीच आपल्याला हा मार्ग बदलायची सुरुवात आजपासून करायची आहे. काहीतरी मुळातून बदलल्याशिवाय आता आपल्या देशात सकारात्मक बदल होणार नाहीत, त्यामुळे त्या मुळातल्या बदलासाठी एक सुजाण नागरिक या नात्याने हे काम आपण करू यात.

### मलमपट्ट्या आणखी किती दिवस?

अर्थशास्त्रातील आकडेवारी मांडून मी आपल्या मनात भ्रम निर्माण करणार नाही. कारण ती कशी फसवी असू शकते, याची हजारो उदाहरणे आपल्याला माहीत आहेत. वाढते दरडोई उत्पन्न, वाढती परदेशी गंगाजळी, सरकारची कमी झालेली तूट, वाढता शेअर बाजार आणि मोठी बाजारपेठ म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेवर जग दाखवीत असलेला विश्वास आणि बरेच काही... याचे जसे आकडेवारीचे तक्ते करता येतील तसे वाढती महागाई, स्वीस बँकेतील भारतीयांचा पैसा, काळ्या पैशाची समांतर व्यवस्था, वाढते कुपोषण, वाढती बेरोजगारी, महागडे

**प्रामाणिकपणे जगू इच्छिणाऱ्यालाही मानाने, प्रतिष्ठेने जगता आले पाहिजे, अशी व्यवस्था अर्थक्रांतीला हवी आहे. म्हणजे ज्याच्या त्याच्या हुशारी– कौशल्यानुसार सत्ता – संपत्ती मिळविण्याचा ज्याचा – त्याचा अधिकर अबाधित राहणार आहे. फरक एवढाच आहे की, आता जी अशांतता, असुरक्षितता भेडसावते आहे, त्या जागी शांतता, सुरक्षितता निर्माण करावयाची आहे.**

शिक्षण, शेतकऱ्यांच्या आत्महत्या... असेही हजारो तर्क करता येतील. त्यातून समन्यायी आणि अर्थपूर्ण जीवनाचे प्रश्न सुटत नाहीत, हे स्वातंत्र्याच्या सहा दशकांच्या प्रवासाने सिद्धच केले आहे. आजचे दुखणे उद्यावर ढकलत आम्ही नव्या शतकात येऊन दाखल झालो. मलमपट्ट्या फार झाल्या, आता रोग मुळातून काढून टाकण्याशिवाय पर्याय नाही. प्रश्न मुळातून सुटण्यासाठी चांगली व्यवस्था निर्माण करणारी इच्छाशक्ती लागते. इच्छाशक्ती निर्माण होण्यासाठी संवेदनशीलता आणि देशाभिमान लागतो. सध्या देशात त्याचीच कमी आहे. ही उणीव आपल्याला 'अर्थपूर्ण'च्या माध्यमातून भरून काढायची आहे.

### ..म्हणून त्या प्रवासालाच निघायचे नाही?

आज अर्थ आणि राज्यव्यवस्था जणू पाच-पंधरा टक्क्यांसाठीच राबविली जाते आहे. अधिकाधिक लोकांचे अधिकाधिक कल्याण हे लोकशाहीचे अंतिम ध्येय आहे, हे आम्ही विसरून गेलो आहोत. मानवी मनातील प्रतिभा फुलण्यासाठी किमान ऐहिक सुबत्ता आवश्यक असते. दुर्दैवाने आपण भारतीय मात्र या उद्दिष्टापासून शेकडो योजने दूर आहोत. चंगळवादाचे किळसवाणे दर्शन मात्र भरपूर पाहायला मिळते आहे. या पार्श्वभूमीवर माणसाची प्रतिष्ठा प्रस्थापित करणारा हा प्रवास सोपा नाही, हे आपण सर्वच जण जाणतो. पण म्हणून त्या प्रवासालाच निघायचे नाही? मला कल्पना आहे, की समन्यायी समानतेच्या गोष्टी केल्या की अनेकांचा गैरसमज होतो. त्याला 'इझम्स'ची नावे दिली जातात. या प्रवासात असे काही 'इझम्स' अर्थक्रांतीला अपेक्षित नाहीत. प्रामाणिकपणे जगू इच्छिणाऱ्यालाही मानाने, प्रतिष्ठेने जगता आले पाहिजे, अशी व्यवस्था अर्थक्रांतीला हवी आहे. म्हणजे ज्याच्या त्याच्या हुशारी- कौशल्यानुसार सत्ता - संपत्ती मिळविण्याचा ज्याचा - त्याचा अधिकर अबाधित राहणार आहे. फरक एवढाच आहे की, आता जी अशांतता, असुरक्षितता भेडसावते आहे, त्या जागी शांतता, सुरक्षितता निर्माण करावयाची आहे. समाज आणि शासनव्यवस्था यांना एकत्र बांधून ठेवणाऱ्या संस्था आपल्यासमोर कोलमडून पडत आहेत. या संस्थांना बळकटी देण्याचे काम अर्थक्रांतीला करावयाचे आहे.

### कोण म्हणतो भारत गरीब देश आहे?

भारत गरीब देश आहे, हे आज कोणीच मान्य करणार नाही. पण तरीही भारतात माणुसकीला काळीमा लावणारे दारिद्र्य मुक्काम ठोकून बसले आहे. काळ्या पैशाने उच्छाद मांडला आहे. नळाला पाणी नियमित येत नसल्याने ते साठविण्याची चढाओढ लागते, तसे आपल्या देशातील संपत्तीचेही झाले आहे. भौतिक सभ्यतेतच मोठेपणा मानणारी वृत्ती शिरजोर झाली आहे. घराघरात संपत्ती जणू सडते आहे. कोणत्याही सुजाण माणसाला नजरेआड करता येणार नाही, असे निर्घृण, उन्मत्त आणि नागडे बकालीकरण आपल्या आजूबाजूला सुरू आहे. केवळ पाशवी नफेखोरीवर उभी असलेली जगातील विकासाची मॉडेल्स दुसऱ्या क्रमांकाची लोकसंख्या असलेल्या भारतीयांवर लादली जात आहेत. **(पान २२ वर)**




सध्याची करप्राप्ती




अर्थक्रांतीची करप्रणाली